**ठळक बातम्या**

- १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज भारतासह जगभरात योगाभ्यास
- नौदलाच्या दुनागिरी, संशोधक आणि अग्रय या युद्धनौकांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते कार्यान्वयन
- नीट फेरपरीक्षा २०२६ ला कडक बंदोबस्तात आणि सुव्यवस्थेत प्रारंभ
- महाराष्ट्र विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरु होणार

**आणि**

- १६ एफ डी सी औषधांच्या उत्पादन, विक्री आणि वितरणावर बंदी

**<><><><><>**

१२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस आज भारतासह जगभरात साजरा होत आहे. 'निरोगी वयोवृद्धीसाठी योग' ही यंदाच्या योगदिनाची संकल्पना आहे. कोलकाता इथल्या रेड रोड इथं योगदिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला, यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी झाले. याविषयी अधिक माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**---व्हीसी----**

*कोलकाता इथं योगदिनाच्या मुख्य कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी झाले. प्रधानमंत्र्यांसोबत हजारो नागरिकांनी आज सकाळी योगासनं केली. २१ जून हा दिवस पृथ्वीच्या काही भागात सर्वांत मोठा दिवस असतो, योग दिनामुळे या दिवशी सर्वात मोठा उत्सवही साजरा होत आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. योग ही केवळ शारीरिक कसरत नाही, तर मानवी चैतन्याची अभिव्यक्ती आहे, असं ते म्हणाले. योग हा आपल्या दैनंदिन आयुष्याचा भाग व्हायला हवा, योग सर्वांना जोडण्याचं काम करतो असं म्हणत प्रधानमंत्र्यांनी सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.*

***होल्ड बाईट मोदी***

***राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू मध्यप्रदेशात जबलपूर इथं आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाल्या. इथल्या गॅरीसन मैदानावर हा कार्यक्रम झाला.*

*योग ही शारीरीक, मानसिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठीची साधना आहे, असं प्रतिपादन **उप राष्ट्रपती** सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे.प्रत्येकाला लहान वयातच योग साधनेची ओळख करून देणं गरजेचं असल्याचंही ते म्हणाले.*

*नवी दिल्लीत संसद भवन परिसरात आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात लोकसभा सभापती **ओम बिर्ला** सहभागी झाले होते. परराष्ट्रव्यवहार मंत्री **एस. जयशंकर** नेहरू पार्क इथं आयोजित कार्यक्रमात सहभागी झाले, यात भारतातल्या नॉर्वेच्या राजदूत मे एलिन स्टिनर याही सहभागी झाल्या होत्या.*

***संरक्षण मंत्री** राजनाथ सिंह मेघालय मधे शिलाँग इथं आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले, त्यांच्यासोबत मेघालयचे मुख्यमंत्री कोनराड संगमा हेही सहभागी झाले होते. योग हा भारताच्या ज्ञानाच्या परंपरेचं प्रतीक असून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा पाया योगामुळे घातला गेला आहे, असं संरक्षण मंत्री समाजमाध्यमातल्या संदेशाद्वारे म्हणाले. तर योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नाही तर जीवनात समतोल साधण्याचा आणि सकारात्मकता जोपासण्याचा हा मार्ग आहे, असं केंद्रीय **गृहमंत्री अमित शहा** म्हणाले.*

***सौदी अरेबिया**त रियाध इथे काल आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा झाला. भारतीय दूतावास आणि सौदी योग समितीने संयुक्तपणे हा कार्यक्रम आयोजित केला होता.*

*मुंबई इथं लोकभवनात आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात महाराष्ट्राचे **राज्यपाल जिष्णूदेव वर्मा** यांनी सहभाग घेतला. लोकभवनात यंदाच्या योगदिनाचं आयोजन भारतीय तटरक्षक दलानं केलं आहे. तटरक्षक दलाचे अधिकारी, त्यांचे कुटुंबीय तसंच लोकभवनातले अधिकारी यात सहभागी झाले. राज्यातल्या सर्व विद्यापीठानी योग साधनेचा प्रचार प्रसार करावा, तसंच उत्तम योग शिक्षक आणि प्रशिक्षक घडवावेत असं आवाहन राज्यपालानीं यावेळी केलं.*

***मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस मुंबईत जुहू बीचवर फूड कोर्ट जवळ आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले. नियमित योग करून जीवनशैलीविषयक आजारांना दूर ठेवायला हवं असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, खासदार रवींद्र वायकर सहभागी झाले होते.*

**<><><><><>**

भारतानं जहाज बांधणी क्षेत्रातल नव्या दृष्टीनं आपली वाटचाल सुरु केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज कोलकाता इथं तीन जहाजांना नौदलाच्या सेवेत सामावून घेण्यात आलं. आयएनएस दुनागिरी, आयएनएस संशोधक आणि आयएनएस अग्रय अशी या जहाजांची नावं असून त्यांचे

डिझाईन नौदलाच्या युद्धनौका डिझाईन ब्यूरोनं केलं असून  बांधणी गार्डन रिच शिपबिल्डर्स आणि इंजिनियर्स या कंपनीनं केली आहे. यांचा वापर युद्ध, गस्ती आणि पाणबुडी विरोधक म्हणून होणार आहे. यातल्या आयएनएस दुनागिरी या युद्धनौकेवर ब्रम्होस क्षेपणास्त्र तैनात करण्यात आलं  आहे. आयएनएस संशोधक या जहाजाचा वापर विविध शोध कार्यसाठी केला जाणार आहे. आयएनएस अग्रय ही पाणबुडी हल्ल्यांपासून बचाव करणाऱ्या यंत्रणेनं सज्ज अशी युद्धनौैका आहे. २०१४ मध्ये असलेल्या देशाच्या संरक्षण उत्पादनात मोठी वाढ झाली असल्याचं सांगताना ते म्हणाले…

**होल्ड -बाईट**

ही तीन जहाजं नौदलाच्या ताफ्यात आल्यामुळे भारताच्या सागरी युद्ध क्षमतेत वाढ झाली असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी नीट फेरपरीक्षा २०२६ आज देशातल्या ५५१ शहरांमधे आणि परदेशातल्या १४ केंद्रांवर सुरु आहे. परीक्षा गैरप्रकारमुक्त वातावरणात व्हावी यासाठी राष्ट्रीय परीक्षा यंत्रणा, एनटीएनं प्रशासनाबरोबर समन्वयानं व्यापक उपाययोजना केल्या आहेत. सकाळी ११ वाजता परीक्षार्थींनी आपापल्या केंद्रावर हजर व्हावं असं एनटीएने सांगितलं होतं.

अनेक ठिकाणी राज्यशासनातर्फे परीक्षार्थींना केंद्रावर जाण्यासाठी विनामूल्य वाहतूक सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मुंबईत बेस्ट उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांनी संप केला असल्यानं राज्यपरिवहन महामंडळ म्हणजेच एसटीच्या ६० गाड्या शहरातल्या ६३ केंद्रांसाठी तैनात करण्यात आल्या आहेत.

परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांच्या मदत आणि मार्गदर्शनासाठी तसंच सुरक्षिततेच्या दृष्टीनं आवश्यक कर्मचारी वर्ग तैनात करण्यात आला आहे. पिण्याचं पाणी,

प्रथमोपचार इत्यादी सुविधाही देशभरात देण्यात आल्या आहेत. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सर्व नीट परीक्षार्थींना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरू होत आहे. आज अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दोन्ही सभागृहांचे गटनेते, तसंच ज्येष्ठ सदस्यांना सह्याद्री अतिथीगृहात चहापान तसंच चर्चेसाठी निमंत्रित केलं आहे.

**<><><><><>**

एफ डी सी म्हणजेच निश्चित मात्रांचं मिश्रण असलेल्या १६ औषधांच्या उत्पादन, विक्री आणि वितरणावर केंद्र सरकारनं बंदी घातली आहे. या औषधांच्या वापरामुळे उपचारात्मकदृष्ट्या विशेष लाभ होत नसल्याचं तसंच त्यांचा सतत वापर केल्यानं होणारे संभाव्य धोके लक्षात घेतं हा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार या औषधांचं पुनरावलोकन केल्यानंतर घेण्यात आलेल्या या निर्णयाची अंमलबजावणी देशभरात तात्काळ केली जात आहे. बंदी घालण्यात आलेल्या औषधांमध्ये त्वचारोगावरची औषधं, वेदनाशामक आणि आकुंचनरोधक औषधं, तसंच प्रतिजैविक-आधारित औषधांचा समावेश आहे. सार्वजनिक आरोग्याचं संरक्षण करणं, योग्य वेळीच औषधांच्या वापराला प्रोत्साहन देणं तसंच केवळ प्रभावी आणि वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेली औषधेच नागरिकांना उपलब्ध करून देणे हा या निर्णयामागचा उद्देश आहे.

**<><><><><>**

राजस्थानच्या संपूर्ण सीमाभागात रेल्वेचे जाळे विणण्यासाठीच्या प्रकल्पाचे काम सुरु असल्याचे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. ते आज बिकानेर

इथं लालगढ साबरमती रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला त्या कार्यक्रमात बोलत होते. या रेल्वे प्रकल्पांमुळे सीमाभागात राहणाऱ्या लोकांची प्रवासाचीच सोय होणार नसून देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीनंही ते महत्वाचे आहे. या प्रकल्पाचा विकास आराखडा तयार करण्यात आला असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं. राजस्थानातल्या रेल्वे प्रकल्पांच्या कामासाठी आता वर्षाला दहा हजार कोटी रुपये निधींची तरतुद केली जात असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

अमरनाथ यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरुंच्या  तातडीच्या नोंदणीचं काम सुलभ आणि विनाव्यत्यय व्हावं यासाठी आज जम्मू काश्मीरच्या जिल्हा मुख्यालयात ७५ डाटा एन्ट्री ऑपरेटरांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आलं.

**//<><><><><>//**